नोंदणी व मुद्रांक विभाग

सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय

5 फायनान्स़ रोड, शासकीय फोटो रजिस्ट्री इमारत, पहिला मजला, बी जे वैदयकिय मुलींचे वसतीगृहासमोर, पुणे -01

दुरध्वणी क्रमांक 020- 26050637 extn Email ID - jdr.punecity@gmail.com

---

**विषय** :- सन 1985 ते 2001 या कालावधीतील मूळ 75000 दस्त संबंधित पक्षकारांना परत करण्यात येत असलेबाबत.

---

1. सन 1990 पुर्वी पुणे शहरात सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. 1 व 2 ही दोन कार्यालये नोंदणी साठी कार्यरत होती, सन 1991 पासून हवेली क्र. 3 ते 9 अशी सात कार्यालये नव्याने निर्माण झाली.

2. दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी दाखल होणारे दस्त नोंदणी झाल्यानंतर त्यांचे स्कॅनिंग करुन मूळ दस्त पक्षकारांना त्वरीत परत करण्यात येतो, हि स्कॅनिंगची पध्दत सन 2002 पासून अवलंबण्यात आलेली आहे. त्यापुर्वी यासाठी फोटाकॉपी करणे, झेरॉक्स करणे, हस्तलिखीत पध्दतीने प्रतिलिपी करणे अशा विविध पध्दती प्रचलित होत्या या प्रत्येकामध्ये काही कालावधी लागत होता व मूळ दस्त लगोलग परत मिळत नव्हते.

3. 1985 ते 2001 या कालावधीतील काही दस्त ज्यावर शेरे मारणे, संबंधित दुय्यम निबंधक यांनी त्यावेळी स्वाक्षरी करणे, प्रतिलिपी करणे हि कामे वेळेच्या वेळी न झाल्याने संबंधित पक्षकारास मूळ दस्त परत देण्यात आले नाहीत व ते कार्यालयामध्ये तसेच पडून होते. काही पक्षकारांनी पाठपुरावा करुन त्यांचे दस्त प्राप्त करुन घेतले. तथापि जेव्हा पक्षकार कार्यालयात मूळ दस्त मिळणेकामी कार्यालयात येतात, तेव्हा दस्त न सापडणे, प्रतिलिपी झालेली नसणे अशा काही कारणांमुळे काही दस्त त्यांना त्यावेळी परत दिलेले नाहीत. सन 1985 ते 2001 या कालावधीत नोंदणीसाठी दाखल झालेले व नोंदणी संबंधातील सर्व प्रकारची कार्यवाही पुर्ण झालेले सुमारे 1.5 लाख मुळ दस्त़ या दुय्यम निबंधक कार्यालयात पक्षकारांना परत करण्यावर शिल्लक आहेत.

4. मूळ दस्त़ नोंदणी नंतर परत मिळणे हा संबंधीत पक्षकाराचा कायदेशीर हक्क़ आहे. तसेच त्या पक्षकारांना बँकेकडून कर्ज घेताना तारण म्हणून ठेवणे, मिळकतीची पुनर्विक्री करणे अशा विविध कारणासाठी मूळ दस्त़ आवश्यक असतात. सहकारी गृहरचना संस्थांची मानीव खरेदीखताची (Deemed Conveyance) प्रकरणे मार्गी लावण्यासाठी देखील संबंधीतांना जून्या मूळ करारनाम्याची आवश्यकता पडत असते. त्यामुळे मूळ दस्तांसाठी संबंधीत पक्षकार या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये चकरा मारत असतात.

5. हे मूळ दस्त सांभाळणे, त्यासाठी ते दस्त घेण्यासाठी येणाऱ्या पक्षकारांना वेळ देणे, त्यासंबंधीचा पत्रव्यवहार हाताळणे इ. कामामध्ये दुय्यम निबंधक कार्यालयात देखील मोठ्या प्रमाणात वेळ जातो. शिवाय दस्त सुरक्षितरित्या ठेवणे हे देखील जबाबदारीचे काम असते त्यासाठी मोठ्या प्रमाणात जागा जाते.

6. या सर्व बाबींचा विचार करून, शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा मोहिमेचा आणि स्वयंप्रेरित प्रशासनाचा (Proactive Governance) भाग म्हणून सह जिल्हा निबंधक, पुणे शहर कार्यालयाने शहरातील दुय्यम निबंधक हवेली क्र. 1 ते 9 कार्यालयामध्ये सन 1985 ते 2001 या कालावधीतील शिल्लक मूळ दस्त पक्षकारांना परत देण्यासाठी उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्या करिता कार्यालयातील शिल्लक सर्व मूळ दस्त पडताळण्यात आले, त्यापैकी सर्व बाबतीत पुर्ण असलेले (शेरे, सह्या इ.) व ज्यांची प्रतिलीपी झालेली आहे असे दस्त वेगळे काढण्यात आले व त्यांची वर्ष निहाय यादी करण्यात आली. पहिल्या टप्पामध्ये एकूण 75000 हजार मूळ दस्त पक्षकारांना परत देण्यासाठी तयार करण्यात आले असून त्याची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सह दुय्यम निबंधक, हवेलीक्र. 1 ते 9 या कार्यालयांचा वर्ष निहाय गोषवारा यासोबत जोडण्यात येत आहे.

7. सदर याद्या नागरिकांना पाहण्यासाठी संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात तसेच सहजिल्हा निबंधक कार्यालय, पुणे शहर येथे उपलब्ध आहेत. तसेच नोंदणी व मुद्रांक विभागाच्या https://igrmaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर 'नागरिकांसाठी' या सदराखाली उपलब्ध आहेत.

8. मूळ दस्त परत करण्याचा उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणून सदर 75000 दस्त तयार करण्यात आले असून यानंतर देखील उर्वरीत दस्तांची छानणी करुन दुसरी यादी लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

9. यादीत नमुद दस्तातील पक्षकार (दस्त नोंदणीस सादर करणारे पक्षकार म्हणजे ज्यांचे नावे नोंदणीफीची पावती बनविलेली आहे असे पक्षकार) यांनी नोंदणीफीची मुळ पावती व स्वत:चे ओळखपत्र घेऊन सबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी जाऊन संपर्क करावा. पावती, ओळखपत्र तपासून त्यांना मूळ दस्त परत देण्यात येईल.

10. मूळ दस्त परत करण्याचा उपक्रमाचा भाग म्हणून सदर सर्व कार्यालये दि. 26.04.2025 व दि. 27.04.2025 रोजी सदर यादीतील मूळ दस्त परत देण्याचे एकमेव कामासाठी सुट्टीच्या दिवशी देखील सुरु राहतील.

11. दुय्यम निबंधक, हवेलीक्र. 1 ते 9 कार्यालयाचे सध्याचे पत्ते व जी.पी.एस. लोकेशन सोबतच्या तक्त्यामध्ये नमूद आहेत.

12. या याद्यांमध्ये दस्त क्रमांक नमूद असलेले संबंधित पक्षकार संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन आपला मूळ दस्त प्राप्त करून घ्यावा असे नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे आवाहन आहे.

SANTOSH ASHOK HINGANE

Digitally signed by SANTOSH ASHOK HINGANE
Date: 2025.04.03 16:17:59 +05'30'

( संतोष हिंगाणे )

सह जिल्हा निबंधक वर्ग-**1** तथा

मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर

| Sr. No | Name of Office | Office Complete Addresss | Office Timing | Weekly Holidays | E-mail Id | Location QR Code |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | HAVELI 1 | Mamledar Kacheri Awar, Shukrawar Peth, Pune - 411002 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | haveli1punecity@gmail.com | |
| 2 | HAVELI 2 | Pushpamangal Building, BibewadiCorner, Pune - 411037 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl2punenew@gmail.com | |
| 3 | HAVELI 3 | Mega Center, Magarpatta , Hadapsar , Pune - 411028 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl3pune@gmail.com | |
| 4 | HAVELI 4 | Sr. No. 6/10/1, First Floor, Rajmata Jijau Sankul, bavdhan khurd, Pune - 411021 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl4pune@gmail.com | |
| 5 | HAVELI 5 | Shevale Complex, Opp. Elpro Company, Near kamini Hotel, Chinchwad Railway Station, Pune - 411033 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl5pune@gmail.com | |
| 6 | HAVELI 6 | 1st floor ,Vaishnavi complex,Sambhaji Nagar, Kadam wak wasti, Loni Kalbhor - 412201 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl6pune@gmail.com | |
| 7 | HAVELI 7 | 1st floor, Pathare Complex, Chandan Nagar, Pune - 411014 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | Hvl7pune@gmail.com | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | HAVELI 8 | S.No. 289, J.J. Complex, Dhanori, Vishrantwadi, Pune - 411015 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl8pune@gmail.com | |
| 9 | HAVELI 9 | Sr.No. 29/1, Gala No. 16, Arihant Chember, Chaitanyanagar, Dhaankwadi Pune - 411043 | 9:45 AM To 6:15 PM | Saturday & Sunday | hvl9pune@gmail.com | |

| सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुन्या मुळ दस्तांच्या यादीचा गोषवारा हवेली क्र. 1 ते 9 | | | | | | | | | | |
| **वर्ष** | **हवेली क्र.1** | **हवेली क्र.2** | **हवेली क्र.3** | **हवेली क्र.4** | **हवेली क्र.5** | **हवेली क्र.6** | **हवेली क्र.7** | **हवेली क्र.8** | **हवेली क्र.9** | **एकुण** |
| 1985 | 6817 | 6832 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 13649 |
| 1986 | 6281 | 5692 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 11973 |
| 1987 | 0 | 461 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 461 |
| 1988 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 1989 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 1990 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 1991 | 0 | 0 | 0 | 77 | 0 | 16 | 0 | 0 | 0 | 93 |
| 1992 | 0 | 0 | 0 | 846 | 722 | 431 | 114 | 297 | 624 | 3034 |
| 1993 | 0 | 0 | 2438 | 1961 | 3208 | 589 | 971 | 1785 | 1626 | 12578 |
| 1994 | 0 | 0 | 100 | 2432 | 1006 | 788 | 1261 | 2108 | 2405 | 10100 |
| 1995 | 0 | 0 | 0 | 2632 | 902 | 397 | 1224 | 2330 | 3453 | 10938 |
| 1996 | 0 | 0 | 0 | 926 | 2024 | 354 | 652 | 0 | 1693 | 5649 |
| 1997 | 0 | 0 | 0 | 401 | 216 | 280 | 429 | 0 | 1335 | 2661 |
| 1998 | 0 | 0 | 0 | 65 | 0 | 286 | 200 | 0 | 411 | 962 |
| 1999 | 0 | 0 | 0 | 60 | 0 | 163 | 129 | 0 | 230 | 582 |
| 2000 | 0 | 0 | 0 | 153 | 0 | 0 | 71 | 0 | 62 | 286 |
| 2001 | 0 | 0 | 0 | 439 | 0 | 148 | 364 | 0 | 122 | 1073 |
| **एकुण** | **13098** | **12985** | **2538** | **9992** | **8078** | **3452** | **5415** | **6520** | **11961** | **75039** |